## सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरू ....)

**श्री. अजित पवार** (उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ चा अर्थसंकल्प दिनांक २३ मार्च, २०११ रोजी मी विधानसभेत मांडला आहे. या अर्थसंकल्पावर तीन दिवस चर्चा होणे अपेक्षित होते. परंतु दरम्यानच्या काळात सभागृहात काही घटना घडल्या, त्यानंतर मोहाली येथे वर्ल्डकपचा सामना होता. हा सामना इंडिया जिंकल्यामुळे आपण आताच त्यांचे सभागृहात अभिनंदन केले आहे. आता वर्ल्डकपचा शेवटचा सामना वानखेडे स्टेडियमवर होणार आहे, या सामन्यासाठी आपण इंडियाच्या टीमला शुभेच्छा दिल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, खरे तर अर्थसंकल्पावर खूप चर्चा झाली पाहिजे, असे दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांचे मत असते. अर्थसंकल्पावर पहिल्या दिवशी जवळपास साडे सहा तास चर्चा झाली आणि आज अडीच तास चर्चा झालेली आहे. अर्थसंकल्पावर एकूण ९ तास चर्चा झालेली आहे. खरे तर मी मांडलेला शासनाचा अर्थसंकल्प काही सन्माननीय सदस्यांना ऐकावासा वाटला नसावा, तरी देखील त्यांना तो अर्थसंकल्प वाचावासा वाटला आणि त्यांनी अर्थसंकल्प वाचून आपली मते मांडली. काही उपयुक्त सूचना देखील केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), सन्माननीय सदस्य सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, रवींद्र वायकर, गोपालदास अग्रवाल, प्रवीण दरेकर, बच्चू कडू, मंगल प्रभात लोढा, सुरेश धस, चिमणराव पाटील, मधू चव्हाण, जयकुमार गोरे, ॲड. उत्तमराव ढिकले, सर्वश्री. अशोक जाधव, सुरेश हाळवणकर, साहेबराव पाटील, विजय शिवतारे, प्रशांत बंब, प्रशांत ठाकूर, चिंतामण वनगा, शंकरराव गडाख, हरिदास भदे, शिरीष कोतवाल, सुनील केदार, राजीव देशमुख, सुरेश जेथेलिया, नामदेव उसेंडी, गिरीश बापट, संजय वाघचौरे, दीपक केसरकर, सुभाष देसाई, ग. आ. देशमुख, बापूसाहेब पठारे, बाळा नांदगावकर, डॉ. विमल मुंदडा, सर्वश्री देवेंद्र फडणवीस, अमिन पटेल, सुरेश जैन, अबू आझमी, हनुमंत डोळस, ॲड. आशिष जयस्वाल आणि श्री. प्रकाश शेंडगे या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे. मी वित्त विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिलाच अर्थसंकल्प सादर केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मला आठवते की, आपण ज्यावेळी सन २००९-१० चा अर्थसंकल्प सभागृहामध्ये मांडला त्यावेळी आपण असे म्हणाला होता की, साधारणपणे चार-साडेचार महिन्यांपूर्वी वित्त विभागाची जबाबदारी माझ्याकडे आलेली आहे. या साडेचार महिन्यांच्या कालावधीमध्ये मी या विभागाचा कारभार समजून घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये काही त्रुटी असू शकतात परंतु सन्माननीय सदस्य त्या समजून घेतील, अशा प्रकारची अपेक्षा आपण त्यावेळी व्यक्त केली होती.

अध्यक्ष महोदय, मला देखील वित्त विभागाचा कार्यभार स्वीकारून चार ते साडेचार महिनेच झालेली आहेत. सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून मी राज्य शासनामार्फत हा अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अर्थ संकल्पाच्या संदर्भात अनेकांची मत वेगवेगळी असू शकतात. हा अर्थसंकल्प सर्वांनाच आपलासा वाटेल किंवा चांगला वाटेल असा दावा मी करणार नाही. परंतु एकंदरीतच राज्याचा हा आर्थिक विकासाचा गाडा विकासाच्या दृष्टीने आपल्याला कसा पुढे नेता येईल याकरिता आमचा सर्वांचा प्रयत्न सुरू होता.

[ **श्री. अजित पवार** ]

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)-साहेब म्हणाले होते की, या अर्थसंकल्पामध्ये काही नावीन्य असेल असे मला वाटले होते. परंतु यामध्ये काहीच नावीन्य नाही. आतापर्यंत अनेक अर्थसंकल्प सभागृहामध्ये सादर करण्यात आलेले आहेत. मी सांगू इच्छितो की, बऱ्याच वर्षानंतर आपण शिलकी अर्थसंकल्प मांडण्यात यशस्वी झालेलो आहोत. खरे तर वेगवेगळ्या प्रकारचे शब्द वापरता येतात. (...अडथळा...) माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)-साहेब मी आपले भाषण १ तास १० मिनिटे अतिशय शांतपणे ऐकून घेतलेले आहे. आपण दिवाळखोर हा शब्द बारीक आवाजामध्ये बोलला तरी सुद्धा तो शब्द मला ऐकू आलेला आहे. आपण माझे उत्तर ऐकून घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) वित्त मंत्री असताना त्यांनी जे उत्तर दिले होते त्यातील काही वाक्ये मी वाचून दाखवितो. ते असे म्हणाले होते की, " सन्माननीय सदस्यांनो आपण जबाबदारीने बोलले पाहिजे, राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोलतांना खबरदारी घेतली पाहिजे, हा तुमचा, माझा किंवा भाजप, शिवसेना पक्षाचा प्रश्न नाही वा कॉंग्रेस पक्षाचा प्रश्न नाही. या महाराष्ट्र राज्याच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. या राज्याच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचता कामा नये. सत्य असेल ते मानले पाहिजे आणि जे चूक असेल ते सरकारच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. मी या बाजूचा आहे. जे सत्य आहे ते मान्य केले पाहिजे. जे चूक आहे ते दुरुस्त करण्याची शासनाची भूमिका आहे आणि त्या दृष्टीकोनातूनच शासन सूचनांचा स्वीकार करीत आहे. या राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली नाही. या राज्याची आर्थिक स्थिती मजबूत आहे. हे राज्य समृध्दीकडे जात आहे. अशी परिस्थिती असताना उगाचच कोलाहल, गोंधळ निर्माण केला जात आहे. " या ठिकाणी सांगण्यात आले की, राज्य ओव्हर ड्राफ्टमध्ये चालले आहे. अगदी केंद्र शासनाने राज्याचा ८०० कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट नाकारला इथपर्यंत बोलण्यात आले. श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेब, बहुतेक याच गोष्टी आहेत. तेव्हा भाजप, शिवसेना पक्षाचे युती शासन होते. आता कॉंग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे आघाडीचे सरकार आहे. आता मला माननीय विरोधी पक्षनेते आणि सभागृहाला हीच बाब सांगायची आहे की, सध्या राज्याची परिस्थिती युती शासनाच्या काळापेक्षा किती तरी पटीने चांगली आहे, ही बाब मी आकडेवारीद्वारे सिध्द करून देऊ शकतो. जेव्हा आपण एखादी जबाबदारी स्वीकारतो तेव्हा एका बाजूने कॅसेट टाकायची आणि विरोधी पक्षात बसल्यानंतर तीच कॅसेट दुसऱ्या बाजूने टाकायची व त्यानुसार बोलण्यास सुरुवात करायची. ही बाब आपल्याला अतिशय चांगल्या प्रकारे जमते. म्हणून आपले अभिनंदन केले पाहिजे, यात कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** साहेब, आपण गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या वेळी तेराव्या वित्त आयोगासंबंधी असा उल्लेख केला होता की, सन २०१३-१४ पर्यंत राज्याची तूट " शून्य " झाल्यास केंद्र शासनाकडून काही हजारो कोटी रुपये दिले जातील. म्हणून सन २०१३-२०१४ पर्यंत राज्यात तूट " शून्य " पर्यंत आणली पाहिजे. अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षीची महसुली तूट साधारणपणे ८००० कोटी रुपये इतकी होती. पुढील वर्षी ती दुप्पट होईन अशा परिस्थातीत शासन सन २०१३-१४ पर्यंत कोणत्या आधारावर महसुली तूट कमी करणार आहे ? ही तूट कमी करण्यासाठी शासनाने

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

कोणत्या प्रकारचा आराखडा किंवा प्लॅनिंग केलेले आहे ? याबाबत मी सदनाला सांगू इच्छितो की, यावेळी अर्थसंकल्प सादर करीत असताना राज्य शासनाने गेल्या वर्षीची हजार कोटी रुपयांची तूट भरून काढलीच काढली. परंतु त्यांचा असा अंदाज होता की, ही तूट दुपटीने म्हणजेच १६,००० कोटी रुपयांनी वाढेल. अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने ती तूट दुपटीने वाढू दिली नाही. उलट या अर्थसंकल्पात तूट भरुन काढून राज्य शासन शिलकीकडे निघालेले आहे. या गोष्टीमुळे विरोधी पक्षनेत्यांना आणि त्यांच्या सन्माननीय सदस्यांना आनंद वाटायला पाहिजे होता. परंतु त्यांनी वेगळाच चष्मा लावून बघितल्यास, आम्ही जे काही केले आहे ते त्यांना चुकीचेच दिसणार आहे. यापेक्षा मला दुसरे काही बोलता येणार नाही.

**श्री. अजित पवार** (उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री) : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांनी त्यांच्या भाषणात विक्रीकर परताव्याच्या संदर्भात उल्लेख केला होता. त्यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ती देणी गृहित धरून सुद्धा या वर्षीचा अर्थसंकल्प शिलकीचा आहे. माननीय विरोधी पक्षनेते यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी अपिलांच्या कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर येणी प्रलंबित असल्याचे सांगितले होते. सदर प्रलंबित असलेली येणी प्राप्त झाल्यास पुढील वर्षी सुद्धा हा अर्थसंकल्प आणखी शिलकीचा होण्यास मदत होऊ शकेन. त्या येण्यामुळे राज्य शासनाच्या महसुलात अधिक वाढ होणार आहे. ही बाब सभागृहाने लक्षात घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांनी त्यांच्या भाषणात एका वित्तीय प्रकाशनाचा उल्लेख करून अतिशय अभ्यासपूर्ण बोलत असल्याचे सांगितले होते. सदर वित्तीय प्रकाशन कोणाचे होते, ते कोणी काढले, यासंबंधी मी जास्त खोलात जाणार नाही. महसुली जमेच्या व्याज प्रदानाची टक्केवारी साधारणपणे २० टक्यांच्या आत असायला पाहिजे, अशा प्रकारचे राजकोषीय धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. त्यांनी कर्जबाजारीच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केला होता. मी या संदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, सन १९९६ ते २००० या काळात युती शासन सत्तेवर असताना तेव्हा महसुली जमेच्या व्याज प्रदानाची टक्केवारी २२.१४ टक्के इतकी होती. सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस, आपण अतिशय बारकाईने आकडेवारी पाहत असता, परंतु तेव्हा आपण आमदार नव्हता, मंत्री होता. एक बाब जरुर लक्षात घेतली पाहिजे की, तेव्हा महसुली जमा २५,२७० कोटी आणि व्याज प्रदान ५५२५ कोटी इतकी होती. युती शासनाच्या काळातील महसुली जमेची व्याज प्रदानाची टक्केवारी २२.१४ टक्क्यांपर्यंत असताना, यावर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पात महसुली जमेची व्याज प्रदानाची टक्केवारी १४.८५ टक्क्यांपर्यंत आली आहे. महसुली जमा १,२१,५०३ कोटी आणि व्याज प्रदाने १८,०४९ कोटी रुपये इतकी आहे. याचा अर्थ व्याज प्रदानाची टक्केवारी १५ टक्क्यांच्या आत आलेली आहे. शेवटी महसुली उत्पन्नातील जमा आणि वाढ किती झाली, याचीसुद्धा तुलना करणे गरजेचे आहे. यामध्ये आणखी सुधारणा केली पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे काहीच कारण नाही. याकरिताच माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने पारदर्शी कारभार करण्याचे ठरविलेले आहे. एकंदरित कारभार करीत असताना आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करणार आहोत. सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर उत्तर देत असताना सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला मी सांगू

[ श्री. अजित पवार ]

इच्छितो की, पडेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल पण राज्याला आर्थिक शिस्त लावूनच दाखविणार. माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही सगळे मिळून या राज्याला आर्थिक शिस्त लावूनच दाखविणार आहोत. यासंदर्भात किती मोठे प्रेशर आले तरी आम्ही कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही. असा शब्द मी सर्व सन्माननीय सदस्यांना देत आहे. हे राज्य कर्जबाजारी आणि दिवाळखोरीकडे चालले आहे अशी भूमिका माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात मांडली होती.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाला उत्तर देताना मी दुसरी आकडेवारी सभागृहाला सांगणार आहे. राजकोषीय धोरणाप्रमाणे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी राजकोषीय तूट साधारणपणे तीन टक्क्यांच्या आत असावी, असे अपेक्षित आहे. १९९९ ते २००० या काळात युतीचे सरकार होते. त्यावेळी राजकोषीय तूट ४.७५ टक्के होती. म्हणजेच स्थूल राष्ट्रीय उत्पन्न साधारणपणे २ लाख ४७ हजार ८३० कोटी आणि राजकोषीय तूट ११ हजार ६६० कोटी होती. लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून मी सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. यामध्ये राजकोषीय तूट ही १.९३ टक्के इतकी आहे. म्हणजेच स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ११ लाख ८४ हजार ६४ कोटी व राजकोषीय तूट २२ हजार ८०४ कोटी ८५ लाख इतकी आहे. यामध्ये तीन टक्के तूट असावी असे असले तरी राज्य शासन २ टक्क्यांच्या आतमध्ये आहे. राज्य शासन यामध्ये आणखी सुधारणा करण्याचा प्रयत्न करणार आहे. यापूर्वी शिवसेना-भाजपा युतीच्या काळात कर्जाची टक्केवारी २० टक्के होती. राज्य शासनाला आता ती तूट १९ टक्क्यापर्यंत आणण्यात यश मिळालेले आहे. अशा तऱ्हेने चांगला अर्थसंकल्प देण्यात राज्य शासन यशस्वी झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी गेली ११ वर्षे अनेक वेगवेगळे विभाग सांभाळलेले आहे. शासनाने आता अर्थ मंत्रीपद माझ्याकडे सोपविलेले आहेत. अर्थसंकल्प सादर करीत असताना मी कोणत्याही लोकप्रिय घोषणा करण्याचा प्रयत्न केलेला नाही. वर्षभराच्या काळामध्ये राज्यातील जनतेला जेवढे देता येईल तेवढेच देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात केलेला आहे. काही झाले तरी मार्च अखेरपर्यंत दिलेला शब्द पूर्ण करता आला पाहिजे. राज्य शासनावर कोणतीही कट लावण्याची वेळ येऊ नये अशा पद्धतीचा विचार अर्थसंकल्प सादर करीत असताना मी केलेला आहे. सन २०११-२०१२ चा अर्थ संकल्प सादर करीत असताना विरोधी पक्षाने माझे भाषण ऐकले पाहिजे होते. पण त्यावेळी गोंधळ घातला. यामध्ये कोणी गोंधळ घातला, याच्या पाठीमागे कोण सूत्रधार आहे याच्या खोलात मला जायचे नाही. कारण तो विषय आता संपलेला आहे. त्यावेळी सभागृहात आणि गॅलरीमध्ये बसलेल्या लोकांनी माझा अर्थसंकल्प ऐकलेला आहे. यापूर्वी माननीय विरोधी पक्षनेते राज्यपालांचे अभिभाषण सुरू असताना माननीय श्री. जयंत पाटील यांना म्हणाले होते की, तुमचे अर्थमंत्री पद गेले. आता तुमच्याकडे ग्रामविकास खाते देण्यात आले आहे. यासंदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, वास्तविक कोणाला कोणते पद द्यावे हा आमच्या अखत्यारितील प्रश्न आहे. पण विरोधी पक्ष नेत्याला माननीय श्री. जयंत पाटील यांच्याबद्दल काय आपलेपणा आला हे मला काही समजले नाही. सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सगळ्यांनी ऐकून घ्यावा असे मला वाटत होते. मात्र त्या वेळी तुमचे काही प्रांत अध्यक्ष व काही लोक तुमचे देखील ऐकत नव्हते.

[ **श्री. अजित पवार** ]

**(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)**

अध्यक्ष महोदय, मी प्रांत अध्यक्ष म्हटलेले आहे. कोणत्याही पक्षाचे नाव घेतलेले नाही. खरे तर माझे मत असे होते की, अर्थसंकल्पीय भाषण पूर्ण ऐकून घेतल्यानंतर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातला असता तर अधिक बरे झाले असते. सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर आता या ठिकाणी बसले आहेत. अर्थसंकल्पावर बोलताना त्यांनी सांगितले की, आम्हाला विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसावे लागले. त्यांना मी सांगू इच्छितो की, शिवसेना पक्षाने आपल्याला खूप वरच्या पायरीवर बसविण्याचे ठरवले आहे. आपण आता त्या तयारीला लागा. त्यामुळे अशा वेळी आपण अधिक जबाबदारीने वागले पाहिजे. मात्र आपण तर कपाळाला हात लावून बसले आहात. असे आपण करू नका.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांचे नाव पुकारण्यात आले होते. मात्र त्या वेळी शिवसेना पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर यांनी बोलण्यास सुरुवात केली. आम्हाला आनंद आहे की, आता त्यांची एकंदरीत जबाबदारी वाढलेली आहे. ज्या वेळी अधिकारांमध्ये वाढ होते, त्यावेळी गटनेत्याने कसे वागायचे असते याचा देखील त्यांनी विचार केला पाहिजे. मी आपणास सांगू इच्छितो की, टीका, टिप्पणी करणारा मी कार्यकर्ता नाही. आपल्या भविष्याकरिता शुभेच्छा देताना मी सांगू इच्छितो की, आपण महानगरपालिकेच्या सभागृहातून आता बाहेर या. तुम्ही येथे अजूनही वॉर्ड, वॉर्ड करीत आहात. मी आपणास सांगू इच्छितो की, हे सभागृह आहे, येथे वॉर्ड नाही. येथे विधानसभा मतदारसंघ आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई बोलत असताना त्यांनी असे सांगितले की, त्यांना काही गोष्टींकरिता माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांची आठवण आली. त्यांचा दाखला देण्यात आला. हे ऐकून मी तर आश्चर्यचकित झालो. त्यांना माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांची कशी काय आठवण आली ? जुन्या सवंगड्यांची आठवण त्यांना येणार, त्याला काही इलाज नाही. कारण त्यांच्यासारखे भारदस्त नेते त्यांच्याकडे नाहीत. त्यामुळे त्यांना या नेत्यांची आठवण येणारच. आता तुमच्याकडे असलेले आणि एकेकाळी आमच्याकडे असणारे सन्माननीय सदस्य श्री. सुरेशकुमार जैन यांना आपण प्रमुख करा.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. सुरेशकुमार जैन यांचे व माननीय विरोधी पक्षनेता श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) यांचे जमले तर ते शक्य आहे.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी असे सांगितले की, काही मंत्र्यांच्या विभागांना देखील निधी मिळाला नाही. माननीय उद्योग मंत्र्यांची मुलाखत प्रसिद्ध झाली. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, या अर्थसंकल्पावर मी समाधानी आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री यांनी देखील अर्थसंकल्पाच्या संदर्भात आपली भूमिका मांडलेली आहे. तसेच माननीय गृह मंत्र्यांनी देखील आपली भूमिका मांडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई व सर्वांना मी आग्रहाची विनंती करू इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये छापून येणाऱ्या बातम्यांवर विश्वास ठेवून आपण चर्चा करावयाला लागलो तर त्यामुळे फार गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. काही वर्तमानपत्रामधील बातम्या येथे मांडण्यात आल्या. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांची कामगिरी आक्रमक नसल्यामुळे गटनेते पद श्री. रवींद्र वायकर यांच्याकडे जाणार अशी देखील वर्तमानपत्रामध्ये बातमी आहे. त्याच वेळी

**[ श्री. अजित पवार ]**

मंत्रिमंडळामध्ये धुसपूस आहे. अशी बातमी होती. त्या बातमीप्रमाणे या बातमीमध्ये देखील काहीही तथ्य नाही. आपण आक्रमक आहात हे मला माहीत आहे. वर्तमानपत्रामध्ये काहीही बातम्या छापून येतात, या बद्दल काही दुमत नाही. मात्र वर्तमानपत्रातील बातम्यांचा आधार घेऊन सभागृहात वक्तव्य करणे योग्य नाही. राज्यातील जनतेला कसे पुढे नेता येईल याचा विचार अर्थसंकल्प मांडत असताना केला गेलेला आहे, हे मी आपणास सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, कुठल्याही परिस्थितीमध्ये एकंदरीतच आपण ज्या प्रकारे पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, त्याबाबतीत वेगवेगळ्या पद्धतीने येथे चर्चा झाली. एका गोष्टीचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) मला आवर्जून करावासा वाटतो की, त्या काळामध्ये आपण बाहेर बसल्यानंतर इतक्या खालच्या पातळीवर जाऊन घोषणाबाजी करीत होता. आपण सभागृहामध्ये काही गोष्टी केल्या. सन्माननीय सदस्य, श्री. हर्षवर्धन जाधव यांना पोलिसांनी मारहाण केल्यानंतर संपूर्ण सभागृह यावर एकत्र आले. माननीय मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री यांनी आमदारांना संरक्षण मिळण्याबाबत भूमिका मांडली आणि आपल्या सगळ्यांचा जो कल होता त्याप्रमाणे निर्णय दिला.

अध्यक्ष महाराज, आपण कायदे करणार, आपण नियम करणार, कोणी अधिकारी चुकीचा वागला की आपण हक्कभंग आणणार, परंतु, येथले काही लोक पायरीवर जाऊन चुकीच्या पद्धतीने घोषणा देतात त्यांच्याबद्दल कोणी काय करावयाचे ? कोणी त्यांना जाब विचारावयाचा, कुठली भाषा हे वापरतात, त्यांची ही संस्कृती आहे का ? त्यांच्या वरिष्ठांनी त्यांना तसे शिकविले आहे का ? त्यांच्यावर तशा पद्धतीने काही संस्कार झालेले आहेत का ? शेवटी ज्या गावच्या बोरी असतात, त्याच गावच्या बाभळी असतात हेही सगळ्यांनी ओळखावे. आम्हालाही वेगवेगळ्या प्रकारच्या घोषणा देता येतात. बापटसाहेब, आपण पुण्याचे आहात, मीही पुण्याचा आहे आपण एकमेकांना चांगले ओळखतो. त्यामुळे आपण एकमेकांना कुठे मदत करावयाची आणि कुठे एकमेकांच्या विरोधात भांडायचे हेही आपल्याला माहीत आहे. आपण त्या घोषणा देणाऱ्यांमध्ये नव्हता. परंतु, गिरीशजी आपण जरा सबुरीने घ्या, फार फास्ट जायची घाई करू नका.

मला सन्माननीय सदस्यांना हे विचारावयाचे आहे की, आजपर्यंत सभागृहामध्ये काम करीत असताना ११ वर्षे माझ्याकडे जी खाती होती, त्या खात्या संदर्भात आपल्यातील कोणताही सदस्य माझ्याकडे एखाद्या कामासाठी आले असता जरी ते काम १०० टक्के झाले नसेल तरी, आपल्याला चांगल्या प्रकारची निश्चितपणे वागणूक देण्याचा प्रयत्न माझ्यासारख्या कार्यकर्त्याने केला. कधीही आम्ही खालच्या पातळीवर गेलो नाही. खडसेसाहेब आपण व देसाईसाहेब आपण शिष्टमंडळासमवेत एका गोष्टी बाबतची अडचण माझ्याकडे सांगितली. सकाळी १०.०० वाजता आपण अडचण सांगितली, मी दुपारी ३.०० वाजता जीआर काढला व त्याला स्थगिती दिली. याचा अर्थ आम्ही कुठे तरी, विरोधाला विरोध समजून काम करणारे कार्यकर्ते नाही. आमच्या राष्ट्रवादी व कॉंग्रेस पक्षाने तशाप्रकारची शिकवणही दिलेली नाही. खरे तर मुद्दा काय होता ? संजय गाधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदाचा मुद्दा होता. नंतर तो मुद्दा कुठल्या कुठे निघून गेला हे आमचे आम्हालाही कळेना नंतर एक एक वेगळेच मुद्दे पुढे यायला लागले. ठीक आहे सभागृहामध्ये निवडून आल्यानंतर प्रत्येक सन्माननीय सदस्याला वाटत असते की, त्याच्या भागातील प्रश्न सुटले पाहिजेत.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महाराज, जसा मी, सन १९९० ते १९९५ च्या बॅचचा आहे तसेच आपणही आहात. सर्व विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य म्हणतात की, आम्हाला निधी मिळाला पाहिजे. विरोधी पक्षनेते गेल्या कित्येक वर्षांचे निधीचे वाटप बघत असताना हा जो काही अर्थसंकल्प सादर केला यामध्ये हे राष्ट्रवादीचे, हे कॉंग्रेसचे असे बघून कोणी वाटप करीत असते का ? त्या ठिकाणी विरोधी पक्षनेत्यांना माहीत आहे की, भाजपा-शिवसेनेच्या सरकारच्या काळामध्ये तुम्ही जी खात्याची विभागणी केली तेव्हा जी, डेव्हलपमेंटची खाती तुमच्याकडे होती ती आता आमच्याकडे आली. शेवटी ऊर्जा खात्याला निधी देणे, जलसंपदा खात्याला निधी देणे महत्त्वाचे आहे. ही डेव्हलपमेंटची खाती आहेत. माननीय श्री. शरद पवारसाहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना, स्वर्गीय वसंतदादा पाटील, स्वर्गीय वसंतराव नाईक, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना प्रत्येक वेळेस या मुख्यमंत्र्यांनी एकंदरीत बजेटच्या ४० टक्के तरतूद या डेव्हलपमेंटच्या खात्याला, ऊर्जा आणि पाटबंधारे खात्याला दिली. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दिमध्ये राज्यात कधी भारनियमन नसायचे, राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण असायचे, आणि तशाच पद्धतीचा आमचा प्रयत्न चाललेला आहे. खडसेसाहेब तुमच्या कारकीर्दीमध्ये विभागनिहाय रकमा तुम्ही दाखवायचाच नाही. एकंदरीत जनरल बजेट सादर करायचा. वास्तविक जरी डिपार्टमेंट आज कोणाकडेही असले तरी आपल्यालाही हे माहीत आहे की, राज्याचे प्रमुख म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनाच राज्याचा कारभार पूर्ण चालवावा लागतो. मंत्रिमंडळातील सहकारी मित्र या नात्याने आम्ही सगळेजण त्यांना सहकार्य करीत असतो. ते करत असताना ज्या काही महत्त्वाच्या गोष्टी राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामध्ये आमच्या शेतकऱ्यांना ० टक्के व्याजाने व २ टक्के व्याजाने कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये भाजपा, शिवसेना राष्ट्रवादी कॉंगेस, कॉंग्रेस, मनसे असा भेदभाव झालेलाच नाही. त्यामध्ये जो शेतकरी कर्ज घेईल आणि जो त्याची वेळेमध्ये परतफेड करेल त्या सर्वांनाच या गोष्टीचा बेनेफिट मिळणार आहे. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख आणि अन्य काही माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांना कर्ज माफी देत असताना फक्त ८४ कोटी रूपयांची तरतूद केली आहे. शेतकऱ्यांना रुपये ५० हजारपर्यंत शून्य टक्के व्याज दराने कर्ज व त्यापुढील रुपये ३ लाखापर्यंतचे कर्ज २ टक्के व्याज दराने देण्यात येणार आहे. त्यामुळे ८४ कोटी रुपये एवढी तरतूद कशी काय केली आहे ? असे विचारले. बजेटमध्ये ८४ कोटी रुपये तरतूद दाखविली असली तरी केंद्र शासनाचा देखील निधी यामध्ये येणार आहे. कारण ४ टक्क्यांच्या वरचे पैसे केंद्र शासन भरणार आहे. यामध्ये राज्य शासनाचा ८४ कोटी रुपये निधी दाखविला आहे. जिल्हा वार्षिक आराखड्यामधून देखील दरवर्षी काही तरी तरतूद आपण त्यामध्ये दाखवतो डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने व्याजाची सवलत देतो. ती तरतूद देखील आपण दाखवितो. सामाजिक न्याय विभागाची तरतूद यामध्ये आलेली नाही. ती तरतूद देखील यात ॲडिशनल म्हणून येणार आहे. आदिवासी विभागाची तरतूद आलेली नाही, ती देखील यात ॲडिशनल म्हणून येणार आहे. असा एकत्रपणे सगळा निधी आपण काढला तर ती रक्कम निश्चितपणे पीक कर्जाच्या व्याजासाठी योग्य ठरेल. तरी देखील मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही राज्य करीत असताना आम्ही शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्त्व करीत आहोत. आज शेतकऱ्याच्या हातामध्ये अर्थ विभाग आहे. शेतकऱ्याला जर पैसे कमी पडले तर राहिलेले पैसे नंतर वाढवून देखील देता येतील, यात कुठलीही अडचण येणार नाही. शून्य टक्के किंवा २ टक्के दराने

[ श्री. अजित पवार ]

जेवढे काही कर्ज आमच्या राज्यातील शेतकऱ्यांना घ्यायचे आहे तेवढे त्यांनी ते घ्यावे व याचा त्यांनी फायदा घ्यावा आणि आपल्या काळ्या आईची इमाने इतबारे सेवा करून अतिशय चांगल्या प्रकारची पिके काढण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी या पाठीमागची भावना आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. खडसेसाहेबांनी सांगितले की, अनुसूचित जातीकरिता १३ टक्के आणि अनुसूचित जमातीकरिता ९ टक्के अशाप्रकारे वार्षिक योजनेच्या मध्ये निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असताना प्रत्यक्षात तरतूद कमी केली आहे. यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शेवटी सर्व जाती-धर्माला घेऊन बरोबर जाणारे, सर्वधर्मसमभाव ही भूमिका घेऊन पुढे जाणारे हे लोकशाही आघाडीचे सरकार आहे. हे जातीयवादी सरकार नाही. कुठल्याही परिस्थितीमध्ये सन २०११-२०१२ मध्ये अनुसूचित जातीकरिता ४२३३ कोटी आणि अनुसूचित जमातीकरिता ३६९३ कोटी रूपयांची तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे, हे बरोबर टक्केवारीमध्ये बसत आहे.

येथे सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा जैन यांनी पंचशील पेपर मिलसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. ३० लाख रुपये रक्कम आली आहे. ११ हप्ते व्यापाऱ्याला देण्यात आले आहेत. व्याज आणि पेनल्टी यामध्ये माफी देण्यात आलेली नाही. तरी देखील माझी सन्माननीय सदस्यांबरोबर बसण्याची तयारी आहे. आपले संबंध कसे आहेत हे एस काँग्रेसपासून माहीत आहे. त्यामुळे मी काही जास्त बोलत नाही. यातील गमतीचा भाग जाऊ द्या. पेनल्टी व व्याजाबाबत आपल्या विभागाचे जेथे कुठे नुकसान होत असेल तर ते थांबविण्याची आमची जरूर तयारी आहे. माझी तर दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना विनंती राहील की, सेल्स टॅक्ससह अन्य रिसोर्सेस निर्माण करणारे विभाग आहेत, त्यात कमतरता दिसली, त्रुटी दिसली तर आपण हमखास सांगावे. त्यामध्ये तातडीने लक्ष घालून जी काही चूक असेल ती दुरुस्त केली जाईल. चूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई देखील केली जाईल. त्याला पाठिशी घालण्याचे काहीच कारण नाही. मी आपल्याकडून अधिकची माहिती घेईन. पण कुठल्याही प्रकारे सेल्स टॅक्सचे नुकसान होऊ देणार नाही. याबद्दलचा शब्द मी अर्थ मंत्री या नात्याने देऊ इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देखमुख यांनी निधी कसा मिळणार हे नमूद केलेले नाही, असे सांगितले. भाग क्रमांक पहिला व भाग क्रमांक दुसरा यात खूप काही गोष्टी देता आल्या असत्या. परंतु, हे दोन्ही भाग साधारणत: एक तास दहा मिनिटांमध्ये वाचावयाचे असतात, असे सूत्र आतापर्यंत जेवढे म्हणून अर्थ मंत्री होऊन गेलेले आहेत त्यांनी ठेवलेले आहे. फार लांबण लावली तर सन्माननीय सदस्य कंटाळतात म्हणून अशी पद्धत अवलंबिलेली आहे. परंतु अन्य बाबतीत सर्व गोष्टींचा समावेश केलेला आहे. १ हजार कोटी रुपये अतिरिक्त महसूल हा घोषित वस्तू, प्रसारक, हक्क, गॉगल्स, मद्य, शीतपेय यामधून कसा येतो हेही सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश वांजळे यांच्या गॉगलकडे बघून मी गॉगल्सवर टॅक्स लावलेला आहे. मला काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही जणांच्या गॉगल्सची किंमत काही लाख रुपये आहे. तेव्हा इतक्या किंमतीचा गॉगल कोणी घालत असेल तर त्यावर टॅक्स लावला पाहिजे. परंतु गोरगरिबांसाठी असलेल्या चष्म्यावर टॅक्स लावलेला नाही. सर्वसामान्य जनतेला महागाईच्या काळामध्ये नीट जीवन जगता यावे यासाठी गहू, तांदूळ, आटा,

[ श्री. अजित पवार ]

मैदा, चहा, एलपीजी गॅस यावर असलेली सूट आणखी एक वर्ष वाढविण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. तेव्हा जवळपास ४०० कोटी रुपयांचा फायदा ग्राहकांना मिळाल्याशिवाय राहणार नाही. ही बाब मी या निमित्ताने सभागृहाच्या लक्षात आणून देतो.

अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्पावर चर्चा करताना काही सन्माननीय सदस्यांनी आरोप केले की आमच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री श्री. छगन भुजबळसाहेब उपस्थित आहेत. सन्माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ उपस्थित आहेत. अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी त्यांच्याशी चर्चा झाली होती. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, संजय गांधी निराधार योजना समितीच्या संदर्भात काही तरी मार्ग काढला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जी पोस्टर्स व स्टीकर्स आणले होते ते काही दहा मिनिटांमध्ये तयार होत नाहीत. हे पोस्टर्स आणि स्टीकर्स गोंधळ घालण्याच्या उद्देशानेच आणले होते. त्या पोस्टर्सवर मागील अर्थ मंत्र्यांची व्यंगचित्रे काढण्यात आली होती. जे आपल्या सभागृहाचे अध्यक्ष आहेत त्यांचे देखील आपण व्यंगचित्र काढत आहोत याचेही भान सन्माननीय सदस्यांना राहिलेले नाही, हे सभागृहाचे दुर्दैव आहे.

मी सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांना सांगू इच्छितो की, माननीय अध्यक्षांना भरपूर अधिकार आहेत. आदरणीय बाळासाहेब भारदे अध्यक्ष असताना एक सदस्य परदेशात असताना त्यांच्यावर ॲक्शन घेऊन त्यांना निलंबित करण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन आपण परदेशात नाही, परंतु कुठे कुठे असता याची मला चांगली माहिती आहे. तेव्हा आपण तिथे असताना माननीय अध्यक्ष आपणास निलंबित करणार नाहीत याची आपण काळजी घ्यावी आणि ते आपणास जड जाईल. तेव्हा तशी वेळ येऊ देऊ नये. ....( अडथळा ).... समोरच्या बाकावरून घोषणा देण्यात येत होत्या त्यावेळी मी काही बोललो होतो काय ? ..

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांना मी सांगू इच्छितो की, आपण ते वाक्य चांगल्या अर्थाने घ्यावे...

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन रुमवर गेल्यावर किती बारकाईने वाचन करतात त्याबद्दल मी बोलत आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन अभ्यास करण्यासाठी सतत ग्रंथालयात असतात.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महाराज, आपण जे सांगत आहात त्याला आमचा पाठिंबा आहे. आमच्या युपीएच्या प्रमुख श्रीमती सोनिया गांधी आहेत. त्यांचे चित्र असलेले पोस्टर्स येथे आणण्याचे काहीही कारण नव्हते. माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे, श्री. गिरीश बापट व श्री. गिरीश महाजन यांनी मला सांगावे की, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी माननीय श्री. वाजपेयी यांच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला तर ते आपणास देखील आवडत नाही. मनसेच्या सन्माननीय सदस्यांना श्री. राज ठाकरे यांचा मुद्दा काढला तर अजिबात आवडणार नाही. सरसेनापती बाळासाहेब ठाकरे, श्री. उध्दव ठाकरे

**[ श्री. अजित पवार ]**

साहेब किंवा श्री. आदित्य ठाकरेसाहेबांचा मुद्दा काढला तर शिवेसनेच्या सदस्यांना आवडणार नाही. कारण आपण त्यांचे नेतृत्व मानत असतो. आम्हाला देखील युपीएच्या प्रमुख माननीय श्रीमती सोनिया गांधी, माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह, आदरणीय श्री शरद पवारसाहेबांचा आदर आहे. हे सर्व मान्यवर संसदेमध्ये असतात, त्यांच्याबद्दल काय बोलायचे ते खासदार बोलतील. परंतु या ठिकाणी त्यांच्याबद्दल येथे खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करणे हे आपल्या पुरोगामी महाराष्ट्राला शोभा देत नाही. मी असे जरूर सांगेन की, आपण आम्हाला आमच्या चुका लक्षात आणून द्याव्यात. कुठे टॅक्समध्ये गडबड होत असेल तर ते लक्षात आणून द्यावे, आणखी अन्य कोणती दुरुस्ती लक्षात आणून द्यावयाची असेल तर ती जरूर आणून द्यावी. परंतु, असे राजकारण कृपा करून कोणी करण्याचा प्रयत्न करू नये. काही काही जणांनी तर अशा बातम्या दिल्या की, “ अजित पवार जोरात होते, अजित पवार नंतर नरमले.” माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील या ठिकाणी बसले आहेत. वास्तविक दुसऱ्या दिवशी श्री. आर. आर. पाटील मला म्हणाले होते की, “ हे संपवून टाका, सगळ्यांचे निलंबन मागे घ्या आणि सभागृहाचे कामकाज सुरू करा.” अध्यक्ष महोदय, रविवारी मी आणि तुम्ही एकत्र पुण्यातील कार्यक्रमाला होतो. मी आपल्याला काय सांगितले होते ? मी पत्रकारांच्या पुढे जास्त जात नाही. मी टिव्हीसमोर सारख्या घोषणा करायला जात नाही. अध्यक्ष महोदय, मी त्याही वेळी तुम्हाला म्हणालो होतो की, “ सोमवारी तुम्हाला वाटेल ते तुम्ही मला सांगा आणि तशा पद्धतीने आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करू. ” कुठेही ताणून धरण्याची भूमिका नाही. ठीक आहे. आमचा स्वभाव थोडासा कडक असेल. सर्वसामान्य लोकांमध्ये काम करायचे असेल, सर्वांना बरोबर घेऊन जावयाचे असेल तर राज्याचे हित कशात आहे, लोकशाहीची परंपरा कशात आहे, त्यामधून काय चांगले आपण साध्य करणार आहोत हे पाहण्याची भूमिका आम्ही डोळ्यांसमोर ठेवतो आणि तशा पद्धतीने पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर साहेब, बरे झाले, मला आठविले. मला काही जणांनी फोन करून सांगितले की, यांचे निलंबन अजिबात मागे घेऊ नका. मी, निलंबन का मागे घेऊ नको, असे विचारले. त्यावेळी सांगण्यात आले की, आमच्यातील एक नेता व्हायला निघाला आहे, त्याचा आपोआप पत्ता कट होईल. सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगावकर साहेब, तुम्ही देखील मला फोन केला होता. आपण दोन वेळा फोनवर बोललो होतो. आपण मला सांगितले की, सकाळी १० वाजता आपण अध्यक्षांच्या दालनात भेटू. परंतु, तुम्ही वेळेवर आला नाहीत, त्यामुळे आपल्याला बोलता आले नाही. तुम्हाला तसेच वाटत होते. सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुखसाहेब देखील तसेच बोलत होते.

सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकरसाहेब, मला अनेकांनी फोन करून सांगितले होते की, निलंबन पुढे वाढवा. ज्यांनी हे सांगितले त्यांची तुम्ही नावे ऐकली तर डायरेक्ट मातोश्रीला जाल आणि काही तरी करून ठेवाल आणि बाकीच्या सन्माननीय सदस्यांचे सदस्यत्व जाईल. त्यामुळे मी त्यांचा तोटा करीत नाही. परंतु, हे फार गंमतीशीर आहे. महानगरपालिकेत आणि येथे चित्र वेगळे आहे, एवढेच मी त्याबद्दल सांगेन.

[ श्री. अजित पवार ]

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)-साहेब, मला तुम्ही सांगितलेली एक गोष्ट समजली नाही. मी, माननीय मुख्यमंत्री आम्ही सर्वजण तुमचे भाषण ऐकत होतो. तुम्ही सांगितले की, १ हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढला आहे. अध्यक्ष महोदय, मी जबाबदारीने सांगतो की, एक रुपयाचा देखील ओव्हरड्राफ्ट काढलेला नाही. राज्याने सन २००५ नंतर एकदाही ओव्हरड्राफ्ट काढलेला नाही. तुमच्यासारख्या सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की वर्तमानपत्रात हेड लाईन येते, " एक हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढला ".

अध्यक्ष महोदय, आपण सांगितले की, " विक्री कराचे यावर्षीचे ४० हजार कोटी रुपयांचे उत्पन्न सरकारच्या परिश्रमामुळे आले नाही तर वाढत्या महागाईमुळे सरकारच्या तिजोरीत आपोआप महसूल जमा झाला. " विक्री कराचा महसूल कमी झालेला आहे. मागील वर्षी विक्री करात १ हजार कोटी रुपये कमी मिळाले आहेत असे सांगण्यात आले. मी आपणास सांगू इच्छितो की, महसुलात काल दिनांक २८.३.२०११ पर्यंत ४६,२१८ कोटी रुपये महसूल विक्री कराच्या रुपाने गोळा केला आहे. मागील वर्षीच्या ३६,९३७ कोटी रुपयांच्या तुलनेत २६ टक्क्यांनी निव्वळ महसूल वाढ झालेली आहे. मागील वर्षीच्या ४३,३०९ कोटी रुपयांच्या तुलनेत जी वाढ आहे, त्यात २६.९ च्या तुलनेत, महागाई फक्त ९ टक्क्यांनी वाढली आहे. महागाई ९ टक्क्यांनी वाढली परंतु, महसूल मात्र २६ टक्क्यांनी जमा झाला आहे. तुम्ही जरूर यामध्ये काही चांगल्या प्रकारच्या सुधारणा करा. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुधारणा सुचविली, सन्माननीय सदस्यांनी देखील सुधारणा सुचविल्या.

अध्यक्ष महोदय, ई-रिटर्न शंभर टक्के सक्तीचे करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिलेच राज्य आहे. आपण पहिल्यांदाच अशा पद्धतीने करीत आहोत. त्याचबरोबर, व्यापाऱ्यांनी सनदी लेखापालांकडून केलेली लेखापरीक्षणाची माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून देण्यास सुरुवात केली आणि विभागाकडून फार मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होऊ शकली. या सगळ्या प्रयत्नांमुळे महसुलात वाढ झाली आहे. अशी पद्धत अंमलात आणणारे भारतातील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. त्याचप्रमाणे आयकर, सेंट्रल एक्साईज आणि कस्टम या विभागांच्या समन्वयाने पथदर्शी प्रकल्पाची सुरुवात भारतामध्ये पहिल्यांदा या राज्याने केलेली आहे. नोंदणीची प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केल्याने व्हॅट नोंदणी भारतात पहिल्यांदाच केलेली आहे. बोगस नमुन्यांचा वापर करून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांना दंड करून महसूल प्राप्त केलेला आहे. वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकण्याचे काम केलेले आहे. त्यामधून महसूल कसा वाढेल, अशा पद्धतीचा प्रयत्न झाला आहे.

अध्यक्ष महोदय, या सगळ्या गोष्टी करीत असताना रद्द झालेला मुंबई विक्रीकर कायदा आणि अन्य कायद्यातील निर्धारणा मोठ्या संख्येने प्रलंबित आहेत, असा मुद्दा सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि काही सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. हे खरे आहे की, दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी २४ लाख ४२ हजार ४८२ निर्धारणा प्रलंबित होत्या. आता जानेवारी, २०११ पर्यंत फक्त ९७११४ निर्धारणा प्रलंबित आहेत. निर्धारणाची ही टक्केवारी ४ टक्के एवढी आहे. आमचा असा प्रयत्न आहे की, मुंबई विक्रीकर कायद्याखाली कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी १० टक्के कर्मचारी यापुढे हे काम चालू ठेवतील. या सगळ्या निर्धारणा येत्या एक वर्षात पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गिरीश बापट यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यावेळी बैठक घेतली होती त्यावेळी मुख्य सचिवांना अशा सूचना दिलेल्या आहेत आणि राज्याने असा निर्णय घेतला आहे की, रिसोर्सेस उपलब्ध करून देणारे जे विभाग आहेत, उदाहरणार्थ, परिवहन विभाग, महसूल विभाग, एक्साईज विभाग, विक्रीकर विभाग या सगळ्या विभागांमधून कराचे उत्पन्न अधिक मिळण्याकरिता जेवढा स्टाफ कमी आहे तो भरण्यात यावा. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे. परंतु, याबद्दलचा निर्णय अगोदरच शासनाने घेतलेला आहे. पण आपण ही सूचना केलेली असल्यामुळे हे काम लवकर कसे पूर्णत्वाला जाईल, असाही प्रयत्न या ठिकाणी केला जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्मानीय गटनेते श्री. सुभाष देसाई यांनी शासनाने जारी न केलेल्या मोटार व्यावसायिकांबाबतची अधिसूचना विक्रीकर विभागाच्या वेबसाईटवर टाकण्यात आली होती, असा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. त्यांनी ही बाब माननीय मुख्यमंत्री आणि माझ्या लक्षात आणून दिली होती. मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, मी त्यांच्याबरोबर अधिकाऱ्यांशी चर्चा केली, त्यांचे काय म्हणणे आहे, अधिकाऱ्यांचे काय म्हणणे आहे, हे जाणून घेतले. अलीकडे एक गोष्ट लक्षात आली आहे की, दिनांक १ एप्रिल, २००५ पासून दिनांक १७ ऑक्टोबर, २००५ या दिनांकापर्यंत असलेल्या मोटार वाहनांना २ टक्के दर लागू करणारी अधिसूचना वेबसाईटवर प्रकाशित झाली होती. सदर अधिसूचना कर सल्लागारांसाठी प्रसिध्द होणाऱ्या खाजगी पुस्तकांमध्ये देखील छापून आलेली आहे. त्या नंतर असे लक्षात आले की, ही अधिसूचना आमच्या विभागाने जारी केलेलीच नाही. सीएसटी कायदा २००५ नंतर देखील अंमलात असलेल्या मोटार वाहनांवरील २००२ च्या अधिसूचनेनुसार २ टक्के सीएसटी दर सन २००५ नंतर देखील लागू राहतो, असे कायदेशीर मत असल्यामुळे या अधिसूचनेमुळे महसुलाची हानी झालेली नाही, असे चौकशीमध्ये पुढे आलेले आहे. तथापि, मंजूर न झालेली अधिसूचना वेबसाईटवर कशी आली, याबद्दलच्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत. सन्माननीय गटनेत्यांनी सूचना केल्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सायबर क्राईम अन्वेषण तज्ज्ञ एजन्सीकडून ही चौकशी आम्ही करून घेत आहोत. विधी व न्याय विभागाला देखील विचारणा करण्यात आली होती. महसुलाची हानी झालेली नाही, असा अहवाल त्या विभागाने दिलेला आहे. तरी देखील राज्य सरकारचे नुकसान होऊ नये म्हणून........

**श्री. सुभाष देसाई :** अध्यक्ष महोदय, महसुलाचे नुकसान झाले आहे, असे विक्रीकर अधिकाऱ्यांनीच मान्य केले आहे.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मी सभागृहात माहिती देत आहे. त्यावेळी अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या वेळी सर्व वस्तुस्थिती समोर आली नव्हती. माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा क्लिअर सूचना दिलेल्या होत्या की, यासंदर्भात कोणी काही चूक केलेली असेल, गडबड केलेली असेल तर ती बाब पुढे आली पाहिजे. त्यानुसार यासंदर्भातील चौकशी केलेली आहे. तरी सुद्धा सायबर क्राईम अन्वेषण तज्ज्ञांकडून माहिती आल्यानंतर हे सर्व कोणत्या संगणकामधून झाले, कशा पद्धतीने झाले, हे सर्व पुढे येईल. अशा प्रकारच्या घटना राज्यामध्ये अजिबात होता कामा नये, याबाबतची खबरदारी आम्ही घेत

[ श्री. अजित पवार ]

आहोत. यामध्ये प्राथमिक अंदाजानुसार कोणतेही नुकसान झालेले नाही. यामध्ये अधिक खोलात जाऊन चौकशी करण्याची संबंधित विभागाची व राज्य सरकारची तयारी आहे, असे मी सभागृहाला सांगू इच्छितो. या राज्याचा विकास करीत असताना सरकारने अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. ऊर्जा विभागाने पायाभूत आराखडा चांगल्या पद्धतीने राबवून खात्रीदायक आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच भारनियमन कसे कमी करता येईल, विजेची गळती व लॉसेस कसे कमी करता येतील. याकडे शासनाचे बारकाईने लक्ष आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांच्या अशा तक्रारी असतात की, आमच्या मतदारसंघातील ट्रान्सफार्मर जळाला आहे. हे प्रकार कमी करण्यासाठी एका ट्रान्सफार्मरवरचा लोड दुसऱ्या ट्रान्सफार्मरवर कसा शिफ्ट करता येईल, याकरिता खूप मोठा कार्यक्रम राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये गावठाण फिडर सेपरेशन व सिंगल फेजिंगची योजना आहे. तसेच राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरणाची योजना आहे. यामुळे गेल्या दोन वर्षात विजेची उपलब्धता वाढलेली आहे. पुनर्रचित गतीमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रमाबाबत शासन योग्य दिशेने पुढे जात आहे. राज्यातील जनतेला या चर्चेच्या निमित्ताने मी असे सांगू इच्छितो की, सन २००९-१० मध्ये विजेची वाढीव क्षमता १०१९ मेगावॅट इतकी होती. यामध्ये दाभोळ प्रकल्पातून ९७० मेगावॅट वीज मिळाली आहे. तसेच कळमगांव येथून ४९ मेगावॅट वीज मिळाली आहे. सन २०१०-११ मध्ये ९०८ मेगावॅट वीज वाढविण्यात शासन यशस्वी झाले आहे. त्यामध्ये परळी व पारस येथून प्रत्येकी २५० मेगावॅट वीज मिळाली आहे. कोरबा येथून १०८ व जेएसडब्ल्यु जिंदालकडून ३०० मेगावॅट वीज मिळालेली आहे. सन २०११-१२ मध्ये ३४८० मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे. या कालावधीत १००० मेगावॅट वीज खाजगी उद्योगपतींकडून किंवा पॉवर प्लॅन्टमधून खरेदी करण्यात येणार आहे. खापरखेडा येथून ५०० मेगावॅट, भुसावळ येथून ५०० अधिक ५०० मेगावॅट, गुजरात येथील मुंद्रा येथून ३२० मेगावॅट, इस्पातमधून ३४० मेगावॅट आणि मध्यम कालावधीकरिता १००० मेगावॅट, अशा प्रकारे ३४८० मेगावॅट वीज यावर्षात उपलब्ध करून घेण्यात येत आहे. यामुळे निश्चितच विजेच्या परिस्थितीत सुधारणा होण्यास हातभार लागणार आहे. त्यामुळे डिसेंबर, २०१२ पर्यंत या राज्याला भारनियमनातून मुक्त करण्यात येणार आहे. या दिशेने राज्य सरकार योग्य पावले टाकीत आहे. यामध्ये काही खाजगी प्रकल्प आहेत.

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट मी सभागृहात मान्य करीन की, मागील काळात जे एमओयू झाले त्यामध्ये सेंट्रल इंडिया पॉवर कंपनी, एसआर पॉवर, जीएमआर एनर्जी, इस्पात एनर्जी, रिलायन्स एनर्जी, स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी किंवा टाटा पॉवर कंपनी यातील एकही प्रकल्प आलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे अध्यक्ष महोदय, त्यावेळी आपण ऊर्जा मंत्री होता. एमओयू संदर्भातील कार्यक्रम सह्याद्री येथे झाला. परंतु त्यामध्ये काही अडचणी आल्या. मला सभागृहातील सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, राज्याला भारनियमनातून मुक्त करण्यासाठी राज्य शासन जी पावले उचलित आहेत, त्यावेळी जैतापूर येथील अणुवीज प्रकल्पाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये. या प्रकल्पातून कोणतेही प्रदूषण होऊ नये, तसेच जपानसारखे धोके निर्माण होऊ नये, या बाबींचा विचार करून हा प्रकल्प कसा उभारता येईल हे पाहण्यात येत आहे.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महोदय, आजही सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस सोफिया प्रकल्पाच्या संदर्भात पोटतिडकीने प्रश्न मांडत असतात. प्रत्येक जिल्ह्यात एक तरी प्रकल्प आला पाहिजे. सोफियाचा एकच प्रकल्प अमरावती जिल्ह्यात स्थापन करण्यात येत आहे. इतर प्रकल्प तेथे देण्यात येत नाहीत. वीज सर्वांना पाहिजे परंतु प्रत्येक सन्माननीय सदस्याचे असे मत असते की, माझ्या जिल्ह्यात, तालुक्यात वीज प्रकल्प स्थापन करण्यात येऊ नये. असा प्रकल्प बाहेरच्या राज्यात गेल्यावर ही राज्ये किती दिवस आपल्या राज्याला वीज देणार आहेत. प्रकल्प स्थापन करताना तेथील शेतकऱ्यांना चांगला मोबदला दिला गेला पाहिजे. त्यांचे नुकसान होणार नाही असे पॅकेज दिले गेले पाहिजे. प्रकल्पामुळे प्रदूषण वाढणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. या सर्व बाबी लक्षात घेऊन जैतापूर, धोपाडी किंवा दोंडाई सारखे प्रकल्प किंवा इतर अनेक महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सभागृहातील दोन्ही बाजुंकडील सन्माननीय सदस्यांनी पुढचा विचार करून अशा प्रकल्पांना मान्यता देण्याचे काम केले पाहिजे. यामध्ये राजकारण करून चालणार नाही, ही गोष्ट सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, आता आपले राज्य स्वयंपूर्ण झालेले आहे. मोठ्या प्रमाणावर आपण वीज देण्यास सुरुवात केलेली आहे. मग आपण शेतकऱ्यांचे भारनियमन का कमी करीत नाहीत ? ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुख आणि माननीय श्री. एन. डी. पाटील दोन दिवसापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. त्यावेळी जी बैठक झाली त्या बैठकीसाठी आम्ही सर्व उपस्थित होतो. मी सांगू इच्छितो की, राज्यामध्ये रात्री अजिबात भारनियमन केले जात नाही. काल मोहाली येथे मॅच होती. आपण त्यावेळी जाणीवपूर्वक पिक अवरची हायड्रोची वीज सुरू ठेवली. कारण काल झालेली मॅच हा प्रत्येकासाठी आनंदाचा क्षण होता. म्हणून आपण काल राज्यामध्ये कोठेही भारनियमन केले नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना ८ तास वीज दिली जाते. शेतकऱ्यांना रात्री शेतीला पाणी द्यावे लागते. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी सुद्धा ८ तास वीज उपलब्ध करून दिली जाते. मी सांगू इच्छितो की, उद्यापासून शेतकऱ्यांना शेतीसाठी १० तास वीज उपलब्ध करून देण्याचे आम्ही मान्य केलेले आहे. मात्र दिवसा १० तास वीज देता येणार नाही. दिवसा ८ तासच वीज दिली जाईल. तुम्ही म्हणाल की, असे का ? कारण दिवसा डोळे उघडे ठेवून शेतीला पाणी दिले जाते आणि रात्री झोपेच्या स्थितीत पाणी दिले जाते. त्यामुळे आम्ही रात्री शेतकऱ्यांना १० तास वीज उपलब्ध करून देण्याचे ठरविलेले आहे. सध्या आपल्या राज्यामध्ये विजेची उपलब्धता असल्यामुळे दिवसा ८ तास आणि रात्री १० तास वीज उपलब्ध करून दिली जाईल. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुखसाहेबांनी शेतकऱ्यांच्या वतीने जी मागणी केली होती ती मागणी शेतकऱ्यांचे शासन या नात्याने लोकशाही आघाडी शासनाने मान्य केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, ठोक तरतुदीच्या संदर्भातील मुद्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. खरे तर मागील अर्थसंकल्पामध्ये ३० हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद ठेवलेली होती. कारण त्यावेळी विधानसभेची निवडणूक होणार होती. सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पामध्ये ठोक तरतूद सामाजिक न्याय विभागाकरिता ४०८ कोटी रुपये, आदिवासी विकास विभागाकरिता ४९८ कोटी रुपये आणि नियोजन विभागाकडे वेगवेगळ्या विभागांसाठी २,५४७ कोटी रुपयांची ठोक तरतूद ठेवलेली आहे. आपल्याला

**[ श्री. अजित पवार ]**

माहिती आहे की, योजने अंतर्गत नियतव्ययाचे वाटप मंत्रिमंडळाच्या नियोजन उपसमितीने मान्य केल्यानंतरच नियतव्यय अर्थसंकल्पित केला जातो. परंतु काही तांत्रिक स्वरूपाच्या बाबीमुळे हा नियतव्यय अर्थसंकल्पात संकल्पित होऊ शकलेला नाही. अशा नियतव्ययाची विनियोजन विभागाच्या तसेच वेगवेगळ्या विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात ठोक तरतूद आलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ही ठोक तरतूद अर्थसंकल्पात समाविष्ट केल्यामुळे वित्तीयस्थिती योग्य प्रकारे दर्शविण्यात आलेली आहे. जर ती आम्ही दाखविली नसती तर ५८ कोटी ऐवजी अजून काही हजार कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प आपल्याला दिसला असता. ठोक तरतुदीचा वापर कोणत्याही खर्चासाठी वा पुनर्विनियोजनासाठी करता येत नाही, हे सभागृहाला माहिती आहे. विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात ज्यावेळी आम्ही पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून नियतव्यय संबंधित विभागाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करू त्याच वेळी ही तरतूद आपल्याला वापरता येईल. त्यामुळे सभागृहाला अंधारात ठेवून शासनाला कारभार करावयाचा नाही. विधिमंडळाच्या मान्यतेनुसारच या तरतुदी खर्चासाठी उपलब्ध होतील. आर्थिक वर्षात ठोक तरतुदी समर्पित केल्या जातात हे देखील आपल्याला माहिती आहे. सदरची ठोक तरतूद दाखविली नसती तर काही हजार कोटी रुपयांची शिल्लक आपल्याला दिसली असती.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. मंगल प्रभात लोढा यांनी एसआरए योजना सरकारी जमिनीवर किंवा महानगरपालिकेच्या जमिनीवर राबविली जाते असे सांगितले. तेथे त्या जमिनीचे ऑक्शन केले तर उत्पन्न वाढेल असेही त्यांनी सांगितलेले आहे. जरूर यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय, आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाईल. ही बाब राज्याच्या फायद्याची आहे. त्यात अनेक जण करोडो रुपये कमवितात. सन्माननीय सदस्य याच व्यवसायात काम करीत असल्यामुळे त्यात नक्की कोण काय कमावते, मला याबाबतची चांगली माहिती आहे. मी एसआरए संबंधी बोलत नाही.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेला ०.३३ एफएसआयच्या माध्यमातून जवळपास १००० कोटी रुपये मिळू शकतील असे सन्माननीय सदस्य श्री. मंगल प्रभात लोढा यांनी उल्लेख केला होता. यासंबंधी सत्ताधारी पक्षाच्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील विशेषत: मुंबईचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या संबंधी सूचना केलेल्या आहेत. मी यासंदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही जेव्हा रिसोर्सेस वाढीसंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत चर्चा करू, तेव्हा उत्पन्न वाढीच्या दृष्टिकोनातून निश्चितपणे विचार करू.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी येथे बसविलेल्या सीसीटीव्ही सिस्टिमसंबंधी उल्लेख केला होता की, ही बाब बीओटी तत्त्वावर कशी केली जाते ? त्या बाबत सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद जठार यांनी माझ्याकडे चिठ्ठी सुद्धा पाठविली होती. मी यासंबंधी सभागृहाला सांगू इच्छितो की, हे काम गृह विभागाचे आहे. सिस्टिम फॉर मुंबई पोलीसच्या संदर्भात कार्यरत असलेल्या कंपनीकडून हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर घेऊन दरवर्षी परफॉर्मन्सेसनुसार डिफर्ड पेमेंटद्वारे ही योजना राबविली जाणार आहे. ती बीओटी पद्धतीने राबविली जाणार नाही. फेज-१ मध्ये राबविल्या जाणाऱ्या पद्धतीत सुरुवातीपासून शासनाचीच मालकी राहणार आहे. यात इतर लोक सहभागी झाल्यास सुरक्षिततेच्या

[ **श्री. अजित पवार** ]

दृष्टीने अडचण निर्माण होईल असे गृह विभागाचे मत आहे. अर्थसंकल्पात बीओटीचा उल्लेख आल्यामुळे साहजिकच अनेक सन्माननीय सदस्यांच्या मनात अशी शंका येणे स्वाभाविक आहे म्हणून मी येथे सन्माननीय सदस्यांच्या शंकेचे निरसन केले आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी मेगा प्रोजेक्टसंबंधी उल्लेख केला होता. मी यासंदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, मोठ्या उद्योगांना आकर्षित करण्यासाठी उद्योग विभागाकडून अनेक सवलती दिल्या जातात. विविध राज्यात मोठ्या उद्योगांना आकर्षित करण्यासाठी विविध सवलती दिल्या जातात. पश्चिम बंगालमध्ये नॅनोचा प्रकल्प होत नसल्यामुळे गुजरातचे माननीय मुख्यमंत्री श्री. मोदी साहेबांनी त्यांना रेड कार्पेट टाकले व तो उद्योग तेथे नेला. आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण व्हावा, तरुणांच्या हाताला कामे मिळावीत या दृष्टिकोनातून राज्य शासनाला अशा प्रकारचे निर्णय घ्यावेच लागतात. अशा प्रकारे आर्थिक परिणामांचा विचार करता राज्य शासनाने मोठ्या उद्योगांना काही प्रमाणात सवलती देण्याचे ठरवले होते. परंतु त्यात काही जणांनी डबल फायदा घेण्याचे काम सुरू केले आहे. मूल्यवर्धित कर कायदा व सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या संदर्भात कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. तामिळनाडू सारखी मोठी राज्ये उद्योगांच्या संदर्भात काही सवलती देत असतात. यासंदर्भात एका बाजूला काही जणांनी डबल सवलती घेतल्या असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या व दुसऱ्या बाजूला ज्या उद्योजकांनी यात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक केली ते माननीय मुख्यमंत्री व माझ्याकडे येतात व आम्हाला सांगतात की, आम्हाला अमुक सवलत मिळणार होती म्हणून आम्ही गुंतवणूक केली होती. या संदर्भात राज्याच्या हिताचा मार्ग काढण्याची भूमिका राज्य शासनाची राहणार आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** अध्यक्ष महोदय, यासंदर्भात ज्यांनी फसवणूक केली त्यांच्या विरुद्ध कोणती कारवाई करणार आहात ?

**श्री. अजित पवार :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्यात व्यवस्थित वातावरण राहावे व राज्याचे नुकसान होणार नाही, तसेच राज्यात होत असलेल्या परदेशी किंवा इतर गुंतवणुकीवर सुद्धा त्याचा परिणाम होऊ नये, या सर्व बाबींचा विचार करून त्यातून मार्ग काढला जाईल.

अध्यक्ष महोदय, यावर्षी अर्थसंकल्प सादर करीत असताना जाणीवपूर्वक जिल्हा वार्षिक आराखड्यासाठी ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मागील काळात जिल्हा वार्षिक आराखड्यासाठी अतिशय कमी प्रमाणात तरतूद केली जात असे. यावेळी काही हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे जेणेकरून त्या त्या भागात निधी जावा. नावीन्यपूर्ण योजनेच्या निमित्ताने त्या जिल्ह्यात कोणकोणती कामे घेतली पाहिजेत यासाठी तेथील पालक मंत्री, लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांना विश्वासात घेऊन कामे करावीत... ही त्या पाठीमागची भावना आहे. म्हणून शासनाने निधी देण्याचे काम केलेले आहे. विरोधकांवर अन्याय केला जातो अशी ओरड सातत्याने विरोधकांकडून केली जाते. सन्माननीय सदस्य श्री. गिरीष महाजन यांनी एक स्टेटमेंट केलेले आहे ते मी सर्वांना सांगणार आहे.

[ **श्री. अजित पवार** ]

आमदार श्री. गिरीष महाजनांच्या प्रयत्नामुळे मेगा पाणलोट प्रकल्पासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मिळाला अशा प्रकारचे त्यांनी स्टेटमेंट केले होते. श्री. चिमणराव पाटील यांच्या एरंडोल मतदारसंघासाठी २२.५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. हे सत्ताधारी पक्षाचे आमदार आहेत काय ? विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) हे ज्यावेळी सत्ताधारी पक्षात होते, त्यावेळी आम्हाला मंत्रालयात यायची भीती वाटत होती. त्यावेळी सत्ताधारी पक्षातील लोक आमच्या विरोधी पक्षनेत्यावर हल्ला करायचे. त्यावेळी ते आमच्या जिवावर उठले होते.....

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे मंगळसूत्र बदलण्याची शंका किंवा विचार माझ्या मनात सुद्धा आलेला नव्हता. कुंकू बदलण्याचे काम मला जमले नाही....

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, आता विरोधी पक्ष नेत्यांना माहीत आहे की, आपले नेते दिल्लीला गेले असल्यामुळे विरोधी पक्षनेतेपद आपल्यालाच मिळणार आहे. त्यामुळेच विरोधी पक्षनेते पद आपल्याला मिळालेले आहे.....गोंधळ...

अध्यक्ष महोदय, यंदाच्या वर्षी काही कारखाने अडचणीत आले आहेत. ते कारखाने बंद ठेवण्यापेक्षा शासनाने लिलाव पद्धतीने काढण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची कार्यवाही करीत असताना कोणत्याही राजकीय अँगलचा विचार करण्यात आलेला नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांना माहीत आहे की, त्यांच्याच पक्षातील किती लोकांनी कारखाने घेतलेले आहेत. मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आम्ही कधी एकतर्फी भूमिका घेतलेली नाही. आमच्या कार्यकाळात कधीही विरोधी पक्षाला कोर्टात जाण्याची वेळ आलेली नाही. परंतु माननीय अध्यक्ष ज्यावेळी विरोधी पक्षात साधे आमदार म्हणून कार्यरत होते, त्यावेळी त्यांना कारखाना मिळत नव्हता म्हणून कोर्टात जाऊन त्यांना भागभांडवल मिळवावे लागले होते.

अध्यक्ष महोदय, खासदार व आमदारांना खासदार आणि आमदार निधी मिळतो. ५ कोटी खासदार निधी आहे. एखादा भाजपाचा खासदार ५ कोटी रुपयांचा निधी आपल्या मतदारसंघात खर्च करीत असताना भाजप आणि शिवसेनेच्याच वॉर्डातच खर्च करीत असतो. तशीच भूमिका राष्ट्रवादी किंवा काँग्रेसचा खासदार आपापल्या मतदारसंघात घेत असतात किंवा पुन्हा निवडून येण्याकरिता वरीलप्रमाणे काम करीत असतात. पण हे काही प्रमाणातच घडते. परंतु राज्याच्या संदर्भात निधी देत असताना कोणताही भेदभाव केला जात नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून यावेळेस कोणतीही टोकाची भूमिका घेतली जाणार नाही, याची मला खात्री आहे. चंद्रपूरला ५०० वर्षे पूर्ण झाली म्हणून तीन वर्षांकरिता २५० कोटी रुपयांचे पॅकेज माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहे. त्यावेळी पक्ष बघून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नव्हती, याची सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी नोंद घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस नेहमी म्हणतात की, विदर्भावर अन्याय केला जातो. विदर्भाचा अनुशेष खूप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. यासंदर्भात मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, अनुशेषाच्या संदर्भात शासनाने एक नवीन कमिटी नियुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा तऱ्हेची कमिटी गठीत सुद्धा करण्यात आलेली आहे. आम्ही राज्यकर्ते म्हणून काम करीत

[ श्री. अजित पवार ]

असताना, आम्हाला सुद्धा वाटते की, जरी मी पुण्याचा असलो किंवा आमचे मुख्यमंत्री कराडचे आहेत. आम्ही दोघे पश्चिम महाराष्ट्रातील आहोत. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री हे पद स्वीकारल्यानंतर आम्ही हाच निश्चय केलेला आहे की, या राज्याच्या बाबतीत सर्वांना सारख्या प्रकारचा न्याय दिला गेला पाहिजे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण किंवा पश्चिम महाराष्ट्र या सर्वांना आम्हाला न्याय द्यावयाचा आहे. अर्थसंकल्पामध्ये दिसून येईल की, काही नेते पश्चिम महाराष्ट्रातील आहेत, म्हणून तेथे अधिक निधी दिलेला नाही. सर्व ठिकाणी निधी देण्याचा प्रयत्न शासनाकडून केला गेला आहे.

अध्यक्ष महोदय, कित्येक दिवसांपासून विदर्भातील लोक व सन्माननीय सदस्य निरनिराळे प्रोजेक्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत होते. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम गोरेवाडा प्रकल्पाकरिता प्रयत्नशील आहेत. ज्या वेळी मंत्रिमंडळाच्या असे लक्षात आले की, ७२० कोटी रुपयांचा कार्यक्रम ५ वर्षांमध्ये राबविला गेल्यास राज्यातील पर्यटनास मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. त्या वेळी त्या संदर्भात प्रयत्न करण्यात आले. सध्या नागपूर येथील विमानतळावर उतरलेले पर्यटक मध्य प्रदेश येथे जातात. या भागामध्ये पर्यटनाला चालना मिळवून दिली तर हे पर्यटक तेथे जाऊ शकतील. पर्यटन व वस्त्रोद्योग विभागाच्या माध्यमातून अधिकाधिक रोजगार उपलब्ध होऊ शकतो. हे लक्षात घेऊन नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. त्याकरिता १०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद कमी पडली तर आणखी तरतूद करण्याची तसेच एनसीटीसी कडून अधिक मदत घेण्याची शासनाची तयारी आहे. केंद्र शासन देखील आमच्याच विचारांचे असल्यामुळे निरनिराळ्या प्रकारच्या कापसावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पाकरिता मदत करण्याची त्यांची तयारी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मिहान प्रोजेक्ट संदर्भात कालच सभागृहात माहिती दिलेली आहे. या प्रकल्पाकरिता ६९ कोटी रुपये एवढी तरतूद केलेली आहे. ती तरतूद कमी आहे, हे मला मान्य आहे. आणखी २५० कोटी रुपये या प्रकल्पासाठी दिले पाहिजेत. ही रक्कम कशी द्यावयाची याचा विचार केला जाईल. केंद्र शासनाकडून मदत आणता येईल काय यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा झालेली आहे. आम्हाला हे माहीत आहे की, जोपर्यंत दोन धावपट्टीमधील गावांमधील लोकांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत मिहान प्रोजेक्ट पूर्ण होऊ शकणार नाही. जोपर्यंत या प्रोजेक्टला गती येत नाही तोपर्यंत गुंतवणूकदार तेथे गुंतवणूक करू शकणार नाही. राज्य शासन जाणीवपूर्वक गोरेवाडा व मिहान प्रोजेक्ट यांना निधी देत आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्याला देखील चांगल्या प्रकारे निधी देण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जात आहे. त्या ठिकाणी भाजपचे कार्यकर्ते आहेत की शिवसेनेचे आहेत, हे आम्ही पाहिले नाही. विदर्भाचा विकास इतर विभागाबरोबर झाला पाहिजे. मराठवाडा, खान्देश हे विभाग देखील पुढे आले पाहिजे, हीच भूमिका पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्र लोकशाही आघाडीच्या शासनाची आहे, ही गोष्ट या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते या ठिकाणी असे म्हणाले की, जुन्या जल विद्युत प्रकल्पाच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी वीज दराच्या आधारित स्पर्धात्मक निविदा पद्धत वापरली जाईल काय ? मी सांगू इच्छितो की, हे सर्व प्रकल्प शासनाच्याच मालकीचे राहणार आहेत. आम्ही ज्या वेळी माहिती

**[ श्री. अजित पवार ]**

घेतली त्यावेळी असे लक्षात आले की, काही राज्यांनी अशा प्रकारचा विचार केला आहे. हायड्रो इलेक्ट्रिक प्रकल्पातून सध्या १२ मे. वॅ. वीज देत असेल तर नवीन टेक्नोलॉजी, चांगली मशिनरी वापरात आणली तर आहे त्याच पाण्यापासून १७ ते १८ मे. वॅ. वीज मिळू शकेल. या नंतर साधारणपणे १२ मे.वॅ. वीज, आहे त्या दराने शासनाला द्यावयाची व त्यावरील विजेची विक्री खाजगी पद्धतीने करावयाची. या पद्धतीने या प्रोजेक्टचे नूतनीकरण करण्याचा एक विचार सध्या पुढे आलेला आहे. यामध्ये पारदर्शकता ठेवण्याची आमची तयारी आहे. तसेच त्याकरिता ई-टेंडरिंग सुरू करण्याची शासनाची तयारी आहे. मात्र या संदर्भात अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ज्या निर्णयामुळे राज्याचे नुकसान होईल, अशा प्रकारचा कोणताही निर्णय या शासनाकडून घेतला जाणार नाही. ही गोष्ट अतिशय स्पष्टपणे मी या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी मानवी विकास निर्देशांकाबद्दल येथे सांगितले. मी या सभागृहात हे मान्य करतो की, मागील अर्थसंकल्पामध्ये मानवी विकास निर्देशांकाच्या संदर्भात कार्यक्रम दिलेला होता. राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात सभागृहात या पूर्वी बरीच चर्चा झालेली आहे. त्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित केलेले आहे. यंदाच्या वर्षी कोणत्याही परिस्थितीत ही योजना पूर्ण केली जाणार आहे. या योजनेच्या टेंडर प्रक्रियेस सुरुवात होईल. गेल्या वर्षी ती योजना राबविता आली नाही. म्हणूनच या वर्षी अर्थसंकल्प सादर करीत असताना ज्या गोष्टी आपल्याला देता येऊ शकतील तेवढ्याच गोष्टी देण्याचा प्रयत्न शासनाने या वेळेस केलेला आहे. यावेळेस मात्र ‘ राजीव गांधी जीवनदायी योजना ’ चांगल्या रितीने राबविण्यासाठी आम्ही बारकाईने लक्ष देत आहोत. मानव विकास निर्देशांकाच्या बाबत विशेषत: मराठवाड्यातील बहुतेक तालुके मागे आहेत. त्यांना मागच्या वेळेस ५०० कोटी रुपयांची तरतूद करूनही ती योजना पुढे गेली नाही हे मी सभागृहाच्या समोर मान्य करेन. परंतु, यावेळेस त्याकरिता ३७५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये आदिवासी विभाग व सामाजिक न्याय विभाग यांच्याकडून जी ॲडिशनल तरतूद होईल तिचा समावेश नाही. साधारण ५०० कोटी रुपयांपर्यंत मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टिकोनातून जी काही खबरदारी घेतली पाहिजे, त्याबद्दल बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुंबई, ठाणे आणि पुणे वगळले तर आपण इतरांच्या बरोबरीने नाही खूप मागे आहोत हे राज्यालाही माहीत आहे. यासाठी इतर जिल्ह्यांना पुढे आणण्याकरिता तालुका बेस धरून ह्या सगळ्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. कॅबिनेटने याला लवकरात लवकर मान्यता दिली पाहिजे, ती मान्यता मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत ही देखील गोष्ट मी सभागृहाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य, श्री. ग. आ. देशमुख यांनी महसुली तुटीबाबत सांगितले की, १३ व्या वित्त आयोगाने निर्धारित केलेल्या तत्त्वाप्रमाणे राज्याची महसुली तूट नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यानुसारच महसुली उत्पन्नात वाढ करून महसुली तूट भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सन २०१०-२०११ या वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार ग्रीन बुकच्या पान क्रमांक १८ वर दर्शविण्यात आलेली अपेक्षित वजा शिल्लक ५१३.८४ कोटी रुपये इतकी आहे. प्रत्यक्ष जमा खर्चाच्या आधारे यात सुधारणा होण्याची शक्यता आहे. यावर्षीची महसुली तूट आणि वर्षा अखेरची शिल्लक याचा तसा संबंध नाही हे मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.

**[ श्री. अजित पवार ]**

अध्यक्ष महाराज, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक महत्त्वाच्या गोष्टी या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मांडलेल्या आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांच्या संदर्भातील काही गोष्टी आहेत. तसेच, श्री. राम शेवाळकर या प्रसिद्ध लेखक व विचारवंताचे यदोचित स्मारक नागपूर येथे झाले पाहिजे. अशीही अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली. राज्य सरकारची अशी भूमिका आहे की, त्यासाठी भरीव तरतूद देऊन श्री. राम शेवाळकर यांच्या नावाला साजेल अशाप्रकारचे एक चांगल्या प्रकारचे स्मारक नागपूर येथे उभारण्यात यावे. इतरही सन्माननीय सदस्यांनी ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना केल्या आहेत, त्याबाबत सहानुभूतीपूर्वक राज्य सरकार या सगळ्या गोष्टींचा विचार करील.

अध्यक्ष महाराज, मला एकच सांगावयाचे आहे की, या वेळेस मुख्यमंत्री व सर्वच विभागांनी हे ठरविले आहे की, एकंदरित पारदर्शकता व्यवहारात आली पाहिजे. कोणत्याही विभागाला व्यवस्थितपणे निधी मिळाला पाहिजे. आर्थिक शिस्त आलीच पाहिजे. कृषी क्षेत्र, ग्रामीण क्षेत्र यासाठी चांगली तरतूद झाली पाहिजे अशाप्रकारच्या बाबी या बजेटमध्ये करण्याचा प्रयत्न आम्ही सरकारच्यावतीने केलेला आहे.

(सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस जागेवर बसून महाअधिवक्ता याबाबत विचारणा करतात.)

सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस आपण जे सांगितले आहे त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, हा मुद्दा माननीय मुख्यमंत्र्याबरोबर चर्चा करून निर्णय घेण्यासारखा आहे. माननीय मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाची आजच बैठक आहे, त्यामध्ये यावर चर्चा होईल.

अध्यक्ष महाराज, मला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, खरे तर सन्माननीय सदस्य, श्री. देवेंद्र फडणवीस आपण अर्थसंकल्पाच्या संदर्भामध्ये अनेक वेगवेगळ्या बाबी मांडल्या. परंतु, एक गोष्ट मला सभागृहाला सांगावयाची आहे की, सन्माननीय सदस्य, श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मला दिलेले "अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय ?" हे मागच्या टर्ममध्ये काढलेले पुस्तक सर्व सन्माननीय सदस्यांना दिले पाहिजे होते म्हणजे बऱ्याच अंशी त्यांनी ज्या काही शंका कुशंका व्यक्त केलेल्या आहेत, त्यांचे निरसन झाले असते.

सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांची कविता काही माननीय सदस्यांनी वाचल्या व काहींनी त्या वाटल्या, काहींनी त्या ऐकल्या. श्री. गिरीश बापट, श्री. सुरेश हाळवणकर यांच्यासह दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी ज्या विधायक सूचना केल्या आहेत, त्याचे मी मनापासून स्वागत करतो. देशात दरडोई उत्पन्नात आपल्या राज्याचा १९ वा क्रमांक आहे, असे येथे सांगितले गेले. मी त्यासंबंधी असे सांगू इच्छितो की, देशामध्ये दरडोई उत्पन्नामध्ये हरियाणा राज्याचा पहिला क्रमांक असून महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे, याने देखील आमचे समाधान होत नाही. आपल्या राज्यातील मागासलेल्या जिल्ह्यांना, तालुक्यांना पुढे आणण्याकरिता आम्हाला प्रयत्न करावाच लागेल. त्यासंबंधी राज्य शासन जाणीवपूर्वक आग्रही भूमिका घेईल. काही सन्माननीय सदस्यांनी अर्थ मंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पासंबंधात कोणकोणती पूर्तता केलेली आहे हे दर्शविणारी पुस्तिका पुढच्या वर्षी काढावी अशी सूचना केली आहे. माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांची सदर सूचना योग्य आहे यामुळे त्या त्या विभागावर देखील काही तरी अंकुश राहील. पुढच्या अर्थसंकल्पाच्या वेळी जरूर त्यासंबंधातील माहिती देण्याचा प्रयत्न सरकारच्यावतीने केला जाईल.

[ **श्री. अजित पवार** ]

आमदार निधी वाढवून द्यावा अशी सर्वांची अपेक्षा आहे. सुरुवातीच्या काळात ३० लाख, ५० लाख, ६० लाख रुपये आमदार निधी होता. गेल्याच वर्षी सदर निधी आपण दीड कोटी केला त्यामुळे सदर निधी खूप काही वाढविता येणार नाही. तथापि, २५ लाख रुपयाची वाढ या निधीमध्ये केली जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, २५ लाख रुपये ही वाढ आमदारांना अजिबात मान्य होणार नाही असे मी म्हणालो होतो. त्यामुळे सर्वांना नीटपणे हा निधी वापरता यावा यासाठी दीड कोटी ऐवजी दोन कोटी इतका निधी करण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्री आणि सरकारने घेतला आहे. आता दोन कोटी रुपये आमदार निधी देण्यात येणार आहे. अजून १५-२० लाख रुपये पाहिजे असतील तर ते आपण मधून देण्याचे काम करू त्याबद्दल शंका बागळण्याचे कारण नाही. दोन्ही बाजूचे माननीय सदस्य सरकारला व्यवस्थित पाठिंबा देतील त्या पद्धतीने त्यांना निधीचे वाटप करण्यात येईल. यातील गमतीचा भाग सोडून द्यावा. सरकार चालवित असताना एकतर्फी काम करून चालत नाही हे आमच्या सारख्या राज्यकर्त्यांना देखील माहीत आहे. राज्याचे मुख्यमंत्री व मी सरकार चालवित असताना एकतर्फी भूमिका कधीच घेणार नाही, अशा प्रकारची खात्री मी या चर्चेच्या निमित्ताने देऊ इच्छितो. मी सन २०११-२०१२ चा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्यास आपण मान्यता द्यावी, ही विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, एक हजार कोटीचा ओव्हर-ड्राफ्ट काढला असे मी जे म्हणालो ते चुकीचे आहे असे आपण सांगितले आहे. या शासनाने एक हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढला आहे. शासनाने जे पिवळ्या रंगाचे पुस्तक दिले आहे त्यात ही आकडेवारी आहे. या पुस्तकाचे नाव आहे महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषिय धोरण व त्याचे विवरणपत्र व प्रगटीकरण.

**अध्यक्ष :** हा अर्थोपाय आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, मी आपल्याला अर्थोपाय रकमा देखील सांगतो. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून घेतलेले अधिकर्ष सांगतो. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये उभारलेली रक्कम शून्य आहे. सन २०१०-२०११ मध्ये उभारलेली रक्कम एक हजार कोटी रुपये आहे व त्याच आर्थिक वर्षामध्ये परतफेड व विमोचन करण्यात आलेली रक्कम एक हजार कोटी रुपये इतकी आहे म्हणजे शासनाने अधिकर्ष, ओव्हरड्राफ्ट काढला. तो ओव्हर ड्राफ्ट सन २०१०-२०११ मध्ये भरला. अशा प्रकारची माहिती आपणच दिलेल्या प्रकाशनामध्ये आहे. आपण म्हणता की ओव्हरड्राफ्ट काढला नाही. मग ह्या पुस्तकातील माहिती चुकीची आहे काय ? चुकीची असेल तर आपण माफी मागावी. आम्हाला हक्कभंग प्रस्ताव दाखल करावा लागेल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, २३ टक्के कर्ज घेतलेले आहे. परंतु महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकातील पृष्ठ २१४ वर " महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न ८०६१ आहे " असे नमूद केलेले आहे आणि शेवटी असा उल्लेख आहे की,... ही टक्केवारी २६ आहे. याचा अर्थ २६ टक्क्यापर्यंत कर्ज उचललेले आहे. तसेच त्या पुस्तकामध्ये राज्य आर्थिक दरडोई उत्पन्नामध्ये किती मागे आहे त्याची आकडेवारी दिलेली आहे. आम्ही या ठिकाणी स्वत:च्या जवळची आकडेवारी दिलेली नाही. राज्य महसुली दरडोई उत्पन्नामध्ये मागे आहे.

[ **श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** ]

अध्यक्ष महाराज, राज्यावरील राजकोषिय तूट फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. तेव्हा अकराव्या, बाराव्या व तेराव्या वित्त आयोगाने देशभरामध्ये जी राज्ये वित्तीय तुटीमध्ये पुढे आहेत त्यांची तूट कमी करण्यासाठी सरळ निधी दिला. म्हणजे सरळ मदत केली. राज्याची तूट संपवून टाका असे सांगून आपले कर्ज माफ केले, व्याज माफ केले म्हणून आपण आता बरोबरीला आलो आहोत, तरी सुद्धा राज्य तुटीमध्ये आहे. केंद्र सरकारने आपल्याला निधी दिला, परंतु त्या अनुषंगाने आपल्याला काही कायदे करावे लागले. केंद्राकडून एक रुपया सुद्धा मिळत नसताना आता आपल्याला अनुदान म्हणून हजारो कोटी रुपये दिले आहेत म्हणून राज्य थोडे वर आले आहे. आपण मागील तुलना करू शकत नाही. केंद्र सरकारने सर्व राज्यांना अशी मदत केलेली आहे. मी यासंदर्भात आपल्याशी वाद घालणार नाही. परंतु उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने ज्या काही बाबी करणे आवश्यक आहेत त्याचा विचार झाला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, विजेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर शेतकऱ्यांना रात्री १० तास वीज देणार आहोत असे सांगण्यात आले. शेतकऱ्यांना दिवसा विजेची आवश्यकता असते. सरकार सांगत आहे की, आमच्याकडे वीज आहे. मागेल त्याला आम्ही कनेक्शन देतो. तेव्हा रात्री १० तास ऐवजी १२ तास वीज द्यावी. पण त्यासाठी दिवसा मिळणाऱ्या विजेमध्ये कपात करू नये. दिवसा ८ तास वीज मिळाली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्पीय बाबींच्या संदर्भात आमच्या काही हरकती आहेत. सरकारने ठोक तरतुदीचे समर्दान केले असले तरी हा बजेटच्या बाहेरचा पैसा आहे. त्याचे पूर्ण अधिकार आपण स्वत:च्या हातात घेत आहात. आमचे असे म्हणणे आहे की, आपणास जे काही करावयाचे असेल ते बजेटमध्ये करावे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मला या संदर्भात शब्द दिलेला आहे की, पुढील बजेटमध्ये असे होणार नाही. मी त्यांचे स्वागत करतो. परंतु बजेटच्या शिस्तीचे पालन केले गेले पाहिजे. आम्ही येथे आकडेवारीनिशी बोलतो. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, राज्य दिवाळखोरीमध्ये आहे, शासनाने हजार कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट काढलेला आहे. ही सर्व आकडेवारी सरकारची आहे. मी स्वत:ची आकडेवारी सांगत नाही. जर दिलेली आकडेवारी चुकीची असेल तर त्याबाबत माफी मागितली पाहिजे की, आमच्या अर्थसंकल्पातील आकडे चुकलेले आहेत. आताच माननीय वित्त मंत्र्यांनी एक आकडा चुकीचा असल्याचे सांगितले. आपण जर हजार रुपये कमी केले तर पुढील सर्व आकडेवारी चुकते. तेव्हा यामध्ये जो कोणी दोषी असेल त्याला शासन केले पाहिजे किंवा सत्य सांगावे की, आम्ही एक हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढला आहे, आम्ही कर्जबाजारी आहोत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**अध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांना यावर बोलता येणार नाही. आपण थोडक्यात बोलला तर आमदार निधी सुद्धा वाढू शकतो.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मी माझ्याकडून क्लिअर केले आहे. १ हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही, हे मी सांगितलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात काही बाकीची माहिती उपस्थित केली. मी सांगू इच्छितो की, शासनाचा खर्च वाढल्याने ज्यावेळी जमा रकमा संपुष्टात येतात, त्यावेळी रिझर्व्ह बँक वाढीव खर्च भागविण्यासाठी वेज ॲण्ड मीन्सच ॲडव्हान्स देते, यामध्ये अर्थोपाय अग्रिम असते. सदर बाबतीत दोन प्रकार असतात, ते आपल्यालाही माहीत आहे. विशेष अर्थोपाय अग्रिम - शासनाने केंद्र शासनाच्या कर्जरोख्यांत केलेल्या गुंतवणुकीच्या ९५ टक्के रक्कम विशेष अर्थोपाय अग्रिम म्हणून मिळते. त्यावेळी व्याज रेपो दरापेक्षा १ टक्का कमी असते. सध्या रेपो दर साडे सहा टक्के आहे. सर्वसाधारण अर्थोपाय अग्रिमाची रिझर्व्ह बँक प्रत्येक वित्तीय वर्षात मर्यादा निश्चित करते. सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी ११०७ कोटी रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे आणि यावरील व्याज ९० दिवसांपर्यंत, रेपो दराएवढे म्हणजे साडेसहा टक्के असते आणि ९० दिवसांच्या नंतर हा दर रेपो दरापेक्षा एक टक्क्यांनी जास्त असतो. शासन अर्थोपाय अग्रिम पूर्णपणे खर्च करते, त्यावेळी रिझर्व्ह बँक खर्च भागविण्यासाठी ओव्हरड्राफ्ट देते, तो १४ दिवसांपर्यंत शासनाला वापरता येतो. १४ दिवसांच्या आत तो परत करणे आवश्यक असते, नाहीतर रिझर्व्ह बँक शासनाची सर्व देणी प्रदान करणे बंद करते. ओव्हरड्राफ्टची जास्तीत जास्त मर्यादा सर्वसाधारण अर्थोपाय अग्रिमाएवढी असते. सन २०१०-११ साठी ११०७ कोटी एवढी मर्यादा आहे. त्यावरील व्याज रेपो दरापेक्षा २ टक्क्यांनी जास्त असते. वरील दरापेक्षा जास्त अधिकर्ष घेतला तर रिझर्व्ह बँक त्या रकमेच्या रेपो दरापेक्षा ५ टक्के जास्त व्याज आकारते. शासन एका तिमाहित ३६ कार्यालयीन दिवसांपर्यंतचे अधिकर्ष त्या ठिकाणी घेऊ शकते.

अध्यक्ष महोदय, सन २०१०-११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अर्थोपाय अग्रिमसाठी ३ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. राज्याचा दैनंदिन जमा खर्च ज्याला कॅश बॅलन्स म्हणतो, वर्षअखेर उद्भवणाऱ्या आकस्मिक खर्चाचा आढावा घेतला जातो. सन २०१०-११ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार ती तरतूद १००० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे. तथापि, सन २०१०-११ मध्ये राज्याला आतापर्यंत एकदाही वेज ॲण्ड मीन्स ॲडव्हान्स रिझर्व्ह बँकेकडून घ्यावा लागलेला नाही. वर्षअखेर या तरतुदीचा विनियोग न झाल्यास दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी यासाठीची तरतूद त्या ठिकाणी प्रत्यार्पित केले जाते. हे नुसते त्यामध्ये दाखविलेले होते. ओव्हरड्राफ्ट घेतलेला नव्हता. आम्ही आता दिनांक ३१ मार्च नंतर ते प्रत्यार्पित करीत आहोत. मी सभागृहाला पुन्हा सांगू इच्छितो की, शासन वेज ॲण्ड मीन्स ॲडव्हान्स पूर्णपणे खर्च करते, त्यावेळी रिझर्व्ह बँक खर्च भागविण्यासाठी ओव्हरड्राफ्ट देते. शासनाने मे, २००५ पासून आजपर्यंत कधीही ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही, हे मला पुन्हा सभागृहाच्या लक्षात आणून द्यायचे आहे. मी सांगितले आहे की, ती रक्कम त्यामध्ये फक्त दाखविली आहे.

**अध्यक्ष :** मी सुद्धा माहिती घेतली आहे. वेज ॲण्ड मीन्स ॲडव्हान्स नुसार एक हजार कोटी रुपये ....

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, आपण ओव्हरड्राफ्ट घेतला नसल्याचे सांगितले तरी इमर्जन्सी रक्कम काढली आहे. राज्याच्या तिजोरीत पैसा नसल्यामुळे ....

**अध्यक्ष :** मी बोलत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते, आपण ऐकून घ्यावे. सभागृहाला सुद्धा हे समजले पाहिजे आणि सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राला सुद्धा समजले पाहिजे. आपणास माननीय अर्थ मंत्र्यांनी खूप सोप्या भाषेत सांगितले आहे. आपण देखील अर्थ मंत्री होता, मी देखील होतो. त्यामध्ये अर्थोपाय ....

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (बसून) : अध्यक्ष महोदय, मी सिनियर आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय विरोधी पक्षनेते, आपण यापूर्वीही सिनियर होता आणि आताही सिनियर आहात. या अनुषंगाने सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अर्थोपाय/ओव्हरड्राफ्ट असे दोन भाग असतात. या ठिकाणी माननीय अर्थ मंत्र्यांनी " अर्थोपाय " चा अर्थ स्पष्टपणे सांगितला आहे की, राज्याच्या ज्या ठेवी असतात, त्या ठेवींच्या माध्यमातून ऐनवेळी खर्चासाठी काही पैसा लागला तर त्यासाठी एका विशिष्ट रकमेची मर्यादा निश्चित करून दिली जाते. ती मर्यादा संपल्यानंतरच ओव्हरड्राफ्टमधून खर्च करण्यास रिझर्व्ह बँकेकडून परवानगी दिली जाते. मर्यादा संपेपर्यंत अशाप्रकारची परवानगी रिझर्व्ह बँकेकडून दिली जात नाही. या ठिकाणी सुद्धा विशिष्ट रकमेची मर्यादा मंजूर करण्यात आलेली होती परंतु, ती रक्कम परत केलेली असल्यामुळे, शासनाने ओव्हरड्राफ्ट घेतला असा अर्थ निघत नाही, असे माझे मत आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महोदय, मी अजूनही म्हणतो की, ज्या अर्थी, अकाऊंट बुकमध्ये रक्कम घेतली आणि भरली अशा दोन एन्ट्रीज आहेत, त्या अर्थी, या एन्ट्री कशाच्या आहेत, हे स्पष्ट झाले पाहिजे. तातडी होती, असे जरी आपण म्हणत असला तरी सरकारच्या तिजोरीमध्ये पैसे नव्हते म्हणून रक्कम उचलली गेली. कोणतेही नाव तुम्ही या व्यवहाराला द्या, पण रक्कम काढली आणि नंतर भरली, ही वस्तुस्थिती आहे.

**अध्यक्ष :** याबाबत माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, माननीय विरोधी पक्षनेते आणि संबंधित अधिकारी अशी आपण एकत्रितपणे माझ्या दालनात चर्चा करू.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महोदय, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ३० मार्चपर्यंत आमदार निधीची रक्कम काही कारणामुळे खर्च झाली नाही. परंतु, अद्याप काही कामे चालू आहेत त्यामुळे किमान ३० जूनपर्यंत खर्च करण्याची परवानगी शासनाने द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, खासदार निधी ५ कोटी रुपये करण्यात आला आहे. आमदार निधी देखील ५ कोटी रुपये करण्यात येणार आहे, असे आम्ही ऐकले आहे. महागाईमुळे किमान हा निधी अडीच कोटी रुपये तरी करावा, अशी आमची विनंती आहे. अडीच कोटी रुपये निधी केला तर " लेखाशीर्ष २५१५ " मधील पैसा आम्ही मागणार नाही कारण तो आम्हाला मिळतच नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, अर्थसंकल्पावरील माननीय अर्थमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणानंतर अशा प्रकारे प्रश्नोत्तरे होत नाहीत. आज ३१ मार्च आहे. आपल्या या मागण्या मान्य करण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी लागेल. लेखाअनुदान विधेयक या सभागृहात मंजूर झाल्यानंतर विधान परिषदेत जाऊन तेथे ते मंजूर व्हावे लागते. त्यामुळे हे विधेयक जेवढे लवकर मंजूर करता येईल तेवढ्या लवकर मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सन्माननीय गटनेते श्री. सुभाष देसाई यांच्यानंतर मी आता कोणालाही या विषयावर बोलण्याची परवानगी देणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभागृहाचे चर्चेचे दोन दिवस वाया घालविले नसते तर आज ही वेळ आपल्यावर आली नसती.

**श्री. सुभाष देसाई :** अध्यक्ष महोदय, आर्थिक शिस्तीचा उल्लेख माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी केला आहे. पण निधीच्या समान वाटपाबाबत समाधानकारक उत्तर सभागृहाला मिळाले नाही. महसूल वाढीबद्दलच्या सूचना स्वीकारण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

अध्यक्ष महोदय, आणखी एक मुद्दा असा आहे की, विक्रीकर घोटाळ्याबाबत ज्या काही सूचना करण्यात आल्या त्यापैकी सायबर क्राईम अन्वेषण एजन्सीकडून चौकशी करण्याचे माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले आहे. अधिसूचना बोगस आहे, हे देखील त्यांनी मान्य केले आहे. परंतु, महसुलाची हानी झाली नाही, हे त्यांचे विधान थोडेसे वेगळे आहे. महसुलाची हानी झालेलीच आहे. एकट्या पुण्याच्या विक्रीकर उपायुक्तांनी ८०२ कोटी रुपयांची वसुली करण्याचे काम सुरू करण्यास परवानगी मागितली आहे. याचाच अर्थ, अधिसूचनेचा गैरफायदा घेतला गेला आहे. म्हणून आमची मागणी आहे की, सीबीआयकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. त्यामधून जे सत्य आहे ते सगळ्यांसमोर येईल.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, उठसूठ कोणत्याही गोष्टीसाठी सीबीआय चौकशीची मागणी करणे, बरोबर होणार नाही. यामधील वस्तुस्थिती पुढे येत नाही, असे लक्षात आले तर वेगळा विचार करता येईल.

**अध्यक्ष :** आता अर्थसंकल्पावरील शेवटच्या दिवसाची सर्वसाधारण चर्चा समाप्त झाली आहे.

---

## वित्त मंत्री यांचा सन २०११-२०१२ चा लेखानुदानावरील प्रस्ताव

**श्री. अजित पवार** (उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र विधानसभा नियम २६२ अन्वये सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी लेखाअनुदानाचा खालील प्रस्ताव या सभागृहासमोर सादर करीत आहे.

"सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी अनुसूचित दर्शविलेल्या शीर्षाप्रमाणे व मागण्यांप्रमाणे रुपये २३,३७९ कोटी ५५ लक्ष ५० हजार यापेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम राज्यपालांना आगाऊ मंजूर करण्यात यावी."